**CNR MHRG040006052012**

**<u>वि.दि.मु.क.४५१/२०१२ मधील नि.</u>**
**<u>दिनांक ०३/०३/२०२२ रोजी दाखल अर्जावरील आदेश</u>**

(श्री. तुकाराम दत्तात्रेय पाटील व इतर
विरुध्द
श्री. गणू बाळू पाटील व इतर )

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम १ नियम १० प्रमाणे दाव्यात पक्षकार म्हणून सामील करण्यासाठी दाखल केला आहे.

<u>अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u> :-

२. सदरचा दावा हा वादीने समस्त मौजे मोहो, ता.पनवेल गावचे मालकी व वहिवाटीची दाव्यामध्ये उल्लेखित जमीन मिळकतीबाबत दाखल केला आहे. सदर दाव्याकामी प्रतिवादी यांना समस्त गावाचे पंच वहिवाटदार म्हणून नोंदवलेले आहे. सदरची दावा मिळकत ही वादी क्र.६ यांच्याकडून वहिवाटीसाठी व गावातील गुरे चरण्यासाठी दिनांक ०९/०४/१९८७ च्या बक्षिस पत्राने पुरोगामी मालक बल्लाळ वासुदेव जोशी व इतर यांना दिलेली होती. समस्त मोहो गाव यांच्यावतीने एकूण २३ लोकांचे नावे सातबारा सदरी नोंदवलेली आहेत. सदर अर्जदारांचे देखील त्यामध्ये नावे असल्यामुळे तसेच त्यांच्यापैकी काही व्यक्तीचे वडील मयत झालानंतर त्यांची नावे रेकॉर्ड घेणे आवश्यक असल्यामुळे त्यांनी त्यांना दाव्यात सामील करुन घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. सदर दावा मिळकत ही गुर चरणासाठी दाखल असून मिळकतीचे सातबारा सदरी आजतागायत अर्जदारांची नोंद आहे. त्यामुळे सदर दाव्यात सामील करुन घ्यावे अशी अर्जदारांनी विनंती केली.

३. वादीने सदर अर्जास कोणतीही हरकत नसलेबाबत म्हणणे दाखल केले आहे. वादी व प्रतिवादीतर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

४. सदर अर्जदारांनी त्यांच्या अर्जाचे पुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. सदर अर्जदार मोहो गावातील रहिवासी असून प्रस्तुत दावा वादीने प्रातिनिधिक

स्वरुपात दाखल केला आहे. सदर दाव्याचे स्वरुप पाहता तसेच वादीची हरकत नसल्याने सदर अर्जदारांना दाव्यात पक्षकार म्हणून सामील करणे न्यायाचे आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करते-

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार विनायक पांडुरंग शेळके, वासुदेव गणू उर्फ गणेश पाटील, नितीन गणू पाठे, ज्ञानदेव नामा भोईर, अरुण नामदेव फडके, दिलीप हरु म्हात्रे, बाबूराव सावळाराम पाटील व प्रविण रमेश सोनावणे यांना पक्षकार म्हणून दाव्यात वादीने सामील करावे व त्याप्रमाणे दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

AVANI ASHWIN GODSE

Digitally signed by AVANI ASHWIN GODSE
Date: 2022.12.19 16:07:39 +0530

पनवेल {अ.अ. गोडसे}
दिनांक :१९/१२/२०२२ २रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,पनवेल
जिल्हा-रायगड.